एफ. आर. पी.
(रास्त व किफायतशीर दर)

माहितीपुस्तिका

शेखर गायकवाड (भा.प्र.से.)
साखर आयुक्त, म.रा.पुणे.

मंगेश तिटकारे
सहसंचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणे

साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-०५
संकेतस्थळ- https://sugar.maharashtra.gov.in
दुरध्वनी क्रमांक ०२०- २५५३८०४१/४२/४३/४४
Email : commissioner.sugar@gmail.com

मनोगत

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण ग्रामीण प्रगतीमध्ये साखर कारखानदारी व ऊस पुरवठादार यांचे योगदान महत्वाचे ठरले आहे. सर्वसाधारणपणे राज्यात दरवर्षी रू.२१ ते रू. २४ हजार कोटी इतकी एफ. आर. पी. महाराष्ट्रातील ऊस पुरवठादार शेतक-यांना कारखान्याकडून दिली जाते. या उद्योगातील शेतक-यांची संख्या साधारणत: ३० लाख असून सभासद संख्या २० लाख इतकी आहे. एफ. आर. पी. ची रक्कम कारखान्याने वेळेवरती देण्यासाठी साखर आयुक्तालयास समन्वय, कायदेशीर उपाय व संनियत्रण करावे लागते. राज्यातील ऊस पुरवठादारांना त्यांच्या तक्रारींची दाद कोठे व कशी मागावी याबाबत निश्चित माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. मागील हंगामात या बाबींवर लक्ष केंद्रीत केल्यामुळे हंगाम संपतानाच सुमारे ९९% इतकी एफ. आर. पी. ची रक्कम ऊस पुरवठादारांना देणे शक्य झाले. या पुस्तिकेचा उपयोग ऊस पुरवठादार शेतकरी, कारखानदार, सर्वसामान्य नागरिक यांना होईल, अशी मी अपेक्षा बाळगतो. श्री. मंगेश तिटकारे यांनी घेतलेल्या प्रयत्नांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

दि.०१ जानेवारी, २०२०
ठिकाण- पुणे.

-शेखर गायकवाड
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	पान क्र.
प्रकरण ०१	एफ.आर.पी. म्हणजे काय?	०१-०७
प्रकरण ०२	एफ.आर.पी.- कायदेशीर तरतूदी	०८-१६
प्रकरण ०३	महसूली विभागणी सुत्रानुसार दर (RSF) म्हणजे काय?	१७-१८
प्रकरण ०४	शेतक-यांनो हे लक्षात ठेवा...	१९-२१
अनुसूची (अ)	प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाचे पत्ते व संपर्क क्रमांक	२२

Disclaimer/अस्विकारण

महाराष्ट्र राज्यातील सर्व सामान्य शेतक-यांसाठी व त्यांना समजेल या भाषेत या पुस्तकाची मांडणी करण्यात आलेली आहे. शेतक-यांचे प्रबोधन हा त्याचा मुळ उददेश आहे. या पुस्तकातील माहिती व मते हि लेखकांनी शेतक-यांना समजेल या भाषेत लिहली आहेत. कायदेशिर दाव्यात याचा उपयोग करता येणार नाही यासाठी मूळ कायदे व त्यातील तरतुदी संबंधितांनी पहाव्यात.

प्रकरण १

➢ एफ.आर.पी (रास्त व किफायतशीर दर) म्हणजे काय?

ऊसाच्या दरासंबंधी नेहमी वापरला जाणारा शब्द म्हणजे एफ.आर.पी. या एफ.आर.पी.चा अर्थ काय, असा प्रश्न आपल्याला नेहमी पडतो.

साखर कारखान्यांना गाळपासाठी ऊस पुरविणारे उत्पादक शेतकरी, पुरवठादार यांना त्यांनी पुरवठा केलेल्या ऊसापोटी साखर कारखान्यांनी द्यावयाची कायदेशीर किमान किंमत म्हणजे एफ.आर.पी. (फेअर ॲण्ड रेम्युनरेटीव्ह प्राईस) अर्थात रास्त व किफायतशीर मूल्य.

विविध राज्य सरकारे आणि साखर उद्योग आणि ऊस उत्पादकांचे संघ यांच्याशी विचारविनियम करून, कृषी मूल्य आयोगाच्या (सी.ए.सी.पी.) शिफारशींच्या आधारावर केंद्र शासन रास्त व किफायतशीर दर (एफ.आर.पी.) प्रत्येक साखर हंगामाच्या (ऑक्टोबर) सुरूवातीस निश्चित करते.

2009 साली ऊस (नियंत्रण) आदेशामध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यामध्ये ऊस उत्पादकांच्या जोखिमा आणि लाभ विचारात घेऊन, माफक नफा मिळण्याची तरतूद केलेली आहे. त्यानुसार दि. 1ऑक्टोबर 2009 पासून अमलात येणाऱ्या 2009-10 पासूनच्या हंगामांचा रास्त व किफायशीर भाव (एफ.आर.पी). निश्चित करण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे.

➢ एफ.आर.पी. कोण व केव्हा जाहीर करते?

विविध राज्य सरकारे आणि साखर उद्योग आणि ऊस उत्पादकांचे संघ यांच्याशी विचारविनियम करून, कृषी परिव्यय व मूल्य आयोगाच्या (सी.ए.सी.पी.) शिफारशींच्या आधारावर रास्त व किफायतशीर भाव (एफ.आर.पी.) प्रत्येक साखर हंगामाच्या म्हणजेच ऑक्टोबरच्या सुरवातीस निश्चित केले जातात.

➢ साधारणत: केंद्र सरकार दरवर्षी ऊसाच्या एफ.आर.पी. चा दर काय आहे, याबाबत प्रत्येक वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यापुर्वी जाहीर करते. हा दर साखर उता-यावर आधारीत आहे व त्याचे सुत्र प्रसिध्द केले जाते.

➢ एफ.आर.पी. परिगणना करण्यासाठी कोणत्या बाबींचा विचार करण्यात येतो?

१) ऊसाच्या उत्पादनाचा खर्च

२) पर्यायी पिकांपासून उत्पादकांना परतावा आणि कृषि मालाच्या किंमतीच्या सर्वसाधारण खर्च

३) ग्राहकांना रास्त भावात साखरेची उपलब्धता

४)ऊसापासून बनविण्यात आलेल्या साखरेची ऊस उत्पादकाद्वारे विक्रीची किंमत

५) ऊसापासून साखरेची पुनर्प्राप्ती

६) उपउत्पादने- ऊसाची चिपाडे, गाळ, प्रेसमड, मळी यांच्या विक्रीपासून जे उत्पन्न किंवा त्यांचे साठी मूल्य

वरील सर्व बाबींचा अभ्यास करून व संबंधित सर्व घटकांशी चर्चा विनिमय करून दरवर्षी एफ.आर.पी. ची शिफारस कृषी परिव्यय व मूल्य आयोग (सी.ए.सी.पी.), केंद्र शासनास करते.

➢ हंगाम सन २०१९-२० हंगामाची एफ. आर. पी. किती आहे?

हंगाम २०१८-१९ पासून चार आधारावर एफ. आर. पी. देण्याची पद्धत सुरू आहे. हंगाम २०१९-२० मध्ये देखील हाच दर कायम आहे खालीलप्रमाणे-

१. १०% साखर उता-यासाठी रू.२७५.०० प्रति क्विंटल

२. रू.२.७ इतका जादा दर (Premium /Qtl) प्रत्येक ०.१% उतारा वाढीसाठी १०% उता-याच्यावर देता येईल.

३. १०% उता-याच्या खाली पण ९.५% उता-यापर्यंत प्रत्येक ०.१ % घटीस रू.२.७५ घट प्रति क्विंटल घट होईल.

४. ९.५% अथवा त्यापेक्षा कमी उतारा असेल तर रू.२६४.२५ प्रति क्विंटल एवढा एफ. आर. पी. दर निश्चित करण्यात आला आहे.

या सुत्रानुसार प्रत्येक साखर कारखाना मागील हंगामाचा सरासरी साखर उतारा (केंद्रिय अबकारी कायदयाखाली अंतिम उत्पादन अहवाल नमुना RT८-C नुसार) विचारात घेवुन ढोबळ एफ.आर.पी. ची गणना करते. केंद्र सरकार उसाचा दर जाहिर करताना शेतातील ऊसाचा दर म्हणजेच ढोबळ (Gross) एफ.आर.पी जाहिर करते. महाराष्ट्रात शेतातुन ऊस तोड करून कारखान्यापर्यंत आणण्याचा खर्च बहुतेक साखर कारखाने शेतक-यांच्या वतीने करतात. महाराष्ट्र व कर्नाटक सोडुन इतर राज्यांमध्ये शेतकरी त्यांचा ऊस कारखान्याच्या ऊसतोडणी वेळापत्रकाप्रमाणे कारखान्याच्या गेटवर आणतात त्यामुळे शेतक-यांच्या वतीने केलेला सरासरी ऊस तोडणी वाहतुक यंत्रणेचा खर्च (H & T expenditure) ढोबळ एफ.आर.पी. तुन वजा करून

निव्वळ (Net) एफ.आर.पी दरानुसार ऊस पुरवठादार शेतक-यांना कारखाने ऊस देयकाची अदायगी करतात.

ऊस तोडणी व वाहतुकीचा खर्च – यामध्ये साधारणत: पुढील खर्च विचारात घेतला जातो.

१. शेतातुन साखर कारखान्यापर्यंतची ऊस तोडणी, भरणे व त्याची वाहतुक करणे यासाठी झालेला खर्च

२. ऊस तोडणी व वाहतुक करणारे मजूर व त्यांची वाहतुक करणारी वाहने यांचा ने-आण करण्यावरील खर्च.

३. मजुर व वाहतुकदार यांना प्रत्यक्ष पुरविलेल्या सोई सुविधांवरील खर्च आणि

४. ऊस तोडणी व वाहतुक यासाठी प्रत्यक्षात दिलेली कमिशनची रक्कम

➢ सूत्रानुसार (एफ.आर.पी.) कशी काढतात?

उदाहरण. ०१ - समजा एखादया कारखान्याचा मागील गाळप हंगामाचा सरासरी उतारा १२.१७% एवढा आहे. तर या हंगामात एफ.आर.पी. ची गणना खालीलप्रमाणे होईल :

१. प्रथम १०% उता-याकरिता	रू.२७५०.०० प्रती मेट्रिक टन
२. पुढील २.१७% उता-याकरिता (२.१७ X २७५)	रू.५९६.७५ प्रती मेट्रिक टन
३. एकूण ढोबळ एफ.आर.पी.	रू.३३४६.७५ प्रती मेट्रिक टन
४. यातून मागील वर्षाचा सरासरी तोडणी वाहतूक खर्च (वजा)	रू.५७२.८० प्रती मेट्रिक टन
५. निव्वळ एफ.आर.पी.	रू.२७७३.९५ प्रती मेट्रिक टन

उदाहरण.०२ – आपल्या कारखान्याचा माग़ील गाळप हंगामाचा सरासरी साखर उतारा ९.६% आहे. तर या हंगामात एफ.आर.पी. ची गणना खालीलप्रमाणे होईल :

१. १०% उता-याचा दर रू.२७५०.०० प्रती मेट्रिक टन

(१०% उता-याच्या खाली पण ९.५% उता-यापर्यंत प्रत्येक ०.१ % घटीस रू.२.७५ घट प्रति क्विंटल घट असे सूत्र आहे. या उदाहरणात घट ०.४% येते.
म्हणजेच ०.४ X २७५ = ११० प्रती मेट्रिक टन एवढ्या रक्कमेची १०% उता-यातून वजावट होईल.)

२. वरील प्रमाणे येणारी रक्कम रू.११०.०० प्रती मेट्रिक टन

३. एकूण ढोबळ एफ.आर.पी.(१-२) रू.२६४०.०० प्रती मेट्रिक टन

४. यातून मागील वर्षाचा सरासरी तोडणी वाहतूक खर्च (वजा) रू.६१०.०० प्रती मेट्रिक टन

५. निव्वळ एफ.आर.पी. रू.२०३० प्रती मेट्रिक टन

उदाहरण.०३ – आपल्या कारखान्याचा माग़ील गाळप हंगामाचा सरासरी साखर उतारा ८.५% आहे. तर या हंगामात एफ.आर.पी. ची गणना खालीलप्रमाणे होईल :

(९.५% अथवा त्यापेक्षा कमी उतारा असेल तर रू.२६४.२५ प्रति क्विंटल एवढा एफ.आर.पी. दर निश्चित करण्यात आला आहे)

१. ८.५% उता-याकरिता लागू दर होतो. रू.२६४२.५० प्रती मेट्रिक टन

२. यातून मागील वर्षाचा सरासरी तोडणी वाहतूक खर्च (वजा) रू.६५० प्रती मेट्रिक टन

३. निव्वळ एफ.आर.पी. रू.१९९२.५० प्रती मेट्रिक टन

➢ एफ.आर.पी. पूर्वी कोणती तरतूद होती ?

एफ.आर.पी. बाबत दि.२२.१०.२००९ च्या नोटीफिकेशननुसार ऊस (नियंत्रण) आदेशामध्ये तरतूद करण्यात आली व ती २००९-१० चा साखर हंगामापासून लागू झाली. तत्पूर्वी ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ खंड ३ नुसार सन २००९ पूर्वी साखरेच्या प्रत्येक हंगामासाठी ऊसाचा संविधानिक किमान भाव (Statutory Minimum Cane Price/ SMP) केंद्र शासनाकडून निर्धारित करण्यात येत होती.

➢ देशामध्ये सर्व ऊस उत्पादक राज्यामध्ये एफ.आर.पी. दिली जाते का ?

बिहार, हरियाणा, पंजाब, तामिळनाडू, उत्तराखंड, उत्तरप्रदेश ही ऊस उत्पादक राज्याने घोषीत केलेली किंमत एस.ए.पी. (State Advised Price/SAP) जाहिर करतात. हे मूल्य एफ.आर.पी. पेक्षा जास्त असते तथापि राज्य शासनाकडून जाहिर होणारी एस.ए.पी. ही कोणत्याही शास्त्रीय आधारावर जाहीर केली जात नाही. ही किंमत साखर उताऱ्यावर आधारित नसते. यामुळे सदर कारखाने/ राज्ये ऊस उत्पादकांना वेळेवर त्यांच्या देय रकमा देण्यास असमर्थ ठरतात. यामुळे या सर्व राज्यांनी एस.ए.पी. देणे बंद करून एफ.आर.पी. द्यावी, अशी शिफारस C.A.C.P. ने केंद्र शासनास केलेली आहे.

या शिफारशीनुसार एफ.आर.पी. व तदनंतर महसूली विभागणी आधारावर आर.एस.एफ. किंमत ऊस पुरवठादार शेतक-यांना देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले व एकमेव राज्य आहे.



प्रकरण -२

➢ एफ.आर.पी. - कायदेशीर तरतूदी

- **ऊस (नियंत्रण) आदेश १९६६** च्या खंड ३ मधील तरतूदीनुसार व सदर आदेश २२ ऑक्टोबर २००९ खंड ग द्वारे सुधारित करण्यात आला असून त्यामध्ये ऊस उत्पादकांच्या जोखिमा आणि लाभ विचारात घेवून माफक नफा मिळण्याची तरतूद केली. दि.०१/१०/२०१९ पासून अंमलात येणा-या सन २००९-१० हंगामापासून साखरेच्या हंगामानुसार रास्त व किफायतशीर दर (एफ.आर.पी.) निश्चित करण्याची शक्ती केंद्र शासनास प्रदान करण्यात आले आहे.

ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ खंड-३ ची मूळ तरतूद खालीलप्रमाणे आहे.

३. Fair and remunerative price++ of sugarcane payable by producer of sugar

(१) The Central Government may, after consultation with such authorities, bodies or associations as it may deem fit, by notification in the Official Gazette, from time to time, fix the fair and remunerative price of sugarcane to be paid by producers of sugar or their agents for the sugarcane purchased by them, having regard to —

(a) the cost of production of sugarcane;

(b) the return to the grower from alternative crops and the general trend of prices of agricultural commodities;

(c) the availability of sugar to the consumer at a fair price;

(d) the price at which sugar produced from sugarcane is sold by producers of sugar;

(e) the recovery of sugar from sugarcane; and

*** (f) the realization made from sale of by products viz. molasses, bagasse and press mud or their imputed value

^ (g) reasonable margins for the growers of sugarcane on account of risk and profits

**Provided that the Central Government or with the approval of the Central Government, the State Government, may, in such circumstances and subject to such conditions as specified in Clause ३-A, allow a suitable rebate in the price so fixed.

(२) No person shall sell or agree to sell sugarcane to a producer of sugar or his agent, and no such producer or agent shall purchase or agree to purchase sugarcane, at a price lower than that fixed under sub-clause (१).

(३) Where a producer of sugar purchases any sugarcane from a grower of sugarcane or from a sugarcane growers" cooperative society, the producer shall, unless there is an agreement in writing to the contrary between the parties, pay within १४ days from the date of delivery of the sugarcane to the seller or tender to him the price of the cane sold at the rate agreed to between the producer and the sugarcane grower or sugarcane growers" cooperative society or that fixed under sub-clause (१), as the case may be, either at the gate of the factory or at the cane collection centre or transfer or deposit the necessary amount in the bank account of the seller or the cooperative society, as the case may be.

(३A) Where a producer of sugar or his agent fails to make payment for the sugarcane purchased within १४ days of the date of delivery, he shall pay interest on the amount due at the rate of १५ per cent per annum for the period of such delay beyond १४ days. Where payment of interest on delayed payment is made to a cane growers society, the society shall pass on the interest to the cane growers concerned after deducting administrative charges, if any, permitted by the rules of the said society.

थोडक्यात :-

१. कलम ३ (१) नुसार एफ. आर. पी. जाहीर करण्याची तरतुद आहे.

२. कलम ३ (१) नुसार जाहीर केलेल्या एफ. आर. पी. च्या पेक्षा कमी किंमतीत ऊसाची खरेदी अथवा करार कोणालाही करता येत नाही. ही बाब कलम ३ (२) मध्ये आहे.

३. केंद्र शासनाने जाहीर केलेली एफ. आर. पी. ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील कलम ३ (३) च्या तरतुदीनुसार ऊस गाळपास आलेल्या दिवसापासून १४ दिवसाचे आत (दोन्ही पक्षांनी करार केला नसल्यास) ऊस पुरवठादारांना एफ. आर. पी. ची रक्कम अदा करणे कारखान्यांवर बंधनकारक आहे.

४. विलंब कालावधीतील ऊस बिलं कलम ३(३)(ए) नुसार १५% विहीत दराने व्याजासह अदा करण्याची तरतुद आहे.

५. एफ.आर.पी. थकबाकी कारखान्यांकडून सूचना देवूनही अदा न झाल्यास संबंधीत कारखान्यांची सुनावणी घेवून व त्यांना पुरेशी संधी देवून ही कार्यवाही न झाल्यास थकीत एफ.आर.पी. वसूलीसाठी कलम ३(८) नुसार रेव्हेन्यु

रिकव्हरी सर्टिफीकेट (R.R.C / आर.आर.सी.) चे आदेश निर्गमित करण्यात येतात.

६. कलम ३ (८) नुसार निर्गमित करण्यात आलेल्या आर. आर. सी. च्या आदेशांची महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कायद्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येते.

➢ एफ.आर.पी. कायद्यातील कराराची तरतूद

- साखर कारखान्यांना ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतूदीनुसार ऊस पुरवठा केल्यापासून १४ दिवसात ऊस दराची रक्कम मिळण्याचा हक्क आहे. तथापि ऊस पुरवठादाराने कारखान्याबरोबर देय रकमेबाबत वैयक्तिक करार केल्यास करारात नमूद केलेप्रमाणे तो ऊसदराची रक्कम स्विकारण्यास पात्र ठरतो. करार करणे शेतक-यांवर बंधनकारक नाही
- परंतु जाहिर केलेल्या एफ.आरपी दरापेक्षा कमी रकमेचा करार करता येत नाही.
- कराराप्रमाणे रक्कम न मिळता, उशीरा मिळाल्यास ऊस पुरवठादार नियमानुसार व्याज मिळण्यास पात्र ठरतो.

➢ महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम २०१३

कलम ८ ऊसाचा दर निश्चित करण्याचे मापदंड :-

(१) शेतक-यांना कलम ४ अन्वये देय असलेला ऊसाचा दर हा साखेरेचे मूल्य उप पदार्थाच्या मूल्यासह जसे कि, भुशाचे (बगॅस) मूल्य, मळीचे (मोर्लॅसिस) मूल्य, प्रेसमडचे मूल्य आणि ऊस तोडणीची व वाहतुकीचा खर्च

अशासारखे पुढील मापदंड लक्षात घेऊन निश्चित करण्यात येईल

(२) उप-नियम (१) मध्ये निर्देश केलेले मापदंड हे पुढीलप्रमाणे असतील :-

(क) साखरेचे मूल्य :- " साखरेचे मूल्य " हे शासनाने ठरविलेल्या सवलतीच्या दराने सदस्यांना दिलेल्या साखरेचा खर्च आणि केंद्र किंवा राज्य शासनाने साखरेच्या निर्यातीस चालना देण्यासाठी दिलेले अर्थसहाय्य यासह कारखान्याला त्या आर्थिक वर्षामध्ये, कच्ची साखर,पांढरी साखर, रिफाईन्ड साखर, नियंत्रित (लेव्ही) साखर (कोणतीही असल्यास), निर्यात केलेली साखर यासारख्या सर्व दर्जाच्या साखरेच्या विक्रीतून मिळालेल्या प्रत्यक्ष रक्कमेनुसार निश्चित करण्यात येईल.

स्पष्टीकरण :- त्या आर्थिक वर्षामध्ये विकल्या न गेलेल्या साखरेच्या मूल्याची परिगणना करताना भारताच्या सनदी लेखापाल संस्थेने निर्गमित केलेल्या लेखांकन मानक - दोन (एएस-दोन) याच्या तरतूदी लागू असतील.

(ख) भुशाचे (बगॅस) मूल्य :- " भुशाचे मूल्य " हे त्या आर्थिक वर्षामध्ये विकलेल्या भुशातून मिळालेल्या प्रत्यक्ष रक्कमेनुसार निश्चित करण्यात येईल आणि त्यामध्ये सरासरी बाजारभावाच्या आधारावर परिगणना केलेल्या, आर्थिक वर्षातील भुशाच्या मूल्याचा समावेश असेल.

परंतु जेथे कारखान्यांना साखरेची निर्मिती करण्याच्या प्रयोजनासाठी,बॉयलरचे इंधन म्हणून भुशाचा उपयोग केला जात असेल तेथे भुशाचे मूल्य निश्चित करतांना त्यामध्ये अशा भुशाच्या खर्चाची गणना केली जाणार नाही.

परंतु आणखी असे की सहवीज निर्मिती (कोजनरेशन) युनिट असणा-या कारखान्याच्या बाबतीत सरासरी बाजारभावानुसार गाळप केलेल्या एकूण ऊसाच्या चार टक्के एवढया सरासरी दराने भुशाच्या प्रमाणाची गणना करण्यात येईल.

(ग) मळीचे (मोलॅसिसचे) मूल्य :- मळीचे मूल्य हे त्या आर्थिक वर्षामध्ये मळीच्या विक्रीतून कारखान्याला मिळालेल्या प्रत्यक्ष रक्कमेइतके असेल.

परंतु, कारखान्याकडे आसवनी युनिट असेल त्याबाबतीत,अशा कारखान्याने अशा आसवनीमध्ये वापरलेल्या किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरलेल्या मळीचे बाजारभावानूसार मूल्य हे उत्पन्न म्हणून विचारात घेण्यात येईल.

परंतु, आणखी असे की त्या आर्थिक वर्षामध्ये कोणतीही मळी विकली न गेल्याने कारखान्याकडे शिल्लक राहिली तर, अशा मळीच्या मूल्याची परिगणना ही सरासरी बाजारभावाच्या आधारे करण्यात येईल.

(घ) प्रेसमडचे मूल्य :- " प्रेसमडचे मूल्य " याचा अर्थ त्या आर्थिक वर्षामध्ये प्रेसमडच्या विक्रीतून कारखान्याला मिळालेली प्रत्यक्ष रक्कम असा आहे :

परंतु, कारखान्याने प्रेसमडचा वापर मिश्र खतासाठी किंवा इतर प्रयोजनासाठी केला असेल त्याबाबतीत अशा प्रेसमडचे सरासरी बाजारभावानुसार मूल्य हे कारखान्याचे उत्पन्न म्हणून विचारात घेण्यात येईल.

परंतु, आणखी असे की, त्या आर्थिक वर्षामध्ये कोणताही प्रेसमड विकला न गेल्याने शिल्लक राहिला तर सरासरी बाजारभावाच्या आधारे परिगणना केलेल्या अशा प्रेसमडचे मूल्य हे कारखान्याचे उत्पन्न असल्याचे मानण्यात येईल.

(इ) ऊसतोडणी व वाहतुकीचा खर्च :- ऊस तोडणी व वाहतुकीच्या खर्चाचे निर्धारण करण्यासाठी केवळ पुढील खर्च विचारात घेण्यात येतील :-

(एक) शेतातून साखर कारखान्यापर्यन्तचा ऊसतोडणी, ऊस भरणे आणि त्याची वाहतूक करणे यासाठी झालेला खर्च,

(दोन) ऊस तोडणी व वाहतूक करणारे मजूर व त्यांची वाहतूक करणारी वाहने याची ने-आण करण्यावरील खर्च.

(तीन) मजूर व वाहतूकदार यांना प्रत्यक्ष पुरविलेल्या सोयीसुविधावरील खर्च आणि (चार) ऊस तोडणी व वाहतूक यासाठी प्रत्यक्षात दिलेली कमिशनची रक्कम.

टिप्पणी - " ऊस तोडणी आणि वाहतुकीसाठी खर्च " निश्चित करताना महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित, मुंबई यांनी निश्चित केलेले दर आणि ऊस तोडणी व वाहतुकीसाठी कारखान्याने अदा केलेला प्रत्यक्ष खर्च, यापैकी कमी असलेली रक्कम ग्राह्य धरण्यात येईल .

कलम 9. उस दर निश्चिती :-

(१) मंडळ ठरवील त्याप्रमाणे ,

(क) एक तर केवळ साखरेच्या विक्रीतून मिळालेल्या रक्कमेच्या आधारे, किंवा

(ख) भुस्सा (बगॅस), मळी (मोलॅसिस) व प्रेसमड या सारख्या प्राथमिक उप-उत्पादनाच्या विक्रीतून मिळालेल्या रक्कमेसह साखरेच्याविक्रीतून मिळालेल्या रक्कमेच्या आधारे, कलम ४ च्या खंड (क) नुसार, ऊस दर निश्चिती करण्यात येईल:

परंतु, उप उत्पादनाची विक्री करतानाचे दर हे त्यावेळच्या बाजारभावापेक्षा

कमी असल्याचे मंडळाच्या निदर्शनास आल्यास ऊस दर निश्चित करताना बाजारभावाप्रमाणे विक्रीचे दर ग्राह्य धरण्यात येतील.

(२) ऊस गाळप करत असलेला प्रत्येक कारखाना आर्थिक वर्षाच्या समाप्तीपासून १२० दिवसाच्या आत, त्याच्या गाळपाचे, साखर, मळी (मोलॅसिस), भुसा (बगॅस) व प्रेसमड यांच्या विक्रीतून मिळालेल्या रक्कमेचे तपशीलवार लेखे, मंडळ वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात ठेवील आणि मंडळाने मागणी केल्याप्रमाणे कारखान्याच्या सांविधिक लेखापरीक्षकाने यथोचितरित्या प्रमाणित केलेली इतर संबंधित माहिती,जी ऊसाचा दर ठरविण्यासाठी मंडळास आवश्यक आहे,सादर करील.

(३) साखर व तिची प्राथमिक उप-उत्पादने यांच्या विक्रीतून मिळणा-या महसुली हिश्श्याची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, प्रत्येक साखर कारखाना, मंडळ वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात अभिलेख ठेवील आणि जेव्हा-जेव्हा मागणी केली जाईल तेव्हा- तेव्हा साखर आयुक्ताच्या कार्यालयात आवश्यक ते दस्तऐवजदेखील सादर करील. तसेच साखर आयुक्ताने वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे सर्व साखर कारखान्यांमध्ये एकरुपता आणण्यासाठीच्या उपाययोजनाही स्वीकृत करील.

(४) कारखान्याकडून ऊस तोडणी व ऊसाची वाहतूक केली जात असेल त्याबाबतीत पुरविलेल्या ऊसासाठीचे प्रदान हे, ऊस तोडणीचा व वाहतुकीचा प्रत्यक्ष खर्च वजा करुन करण्यात घेईल.

(५) मंडळ, ठरावाद्वारे ऊसाचा दर निश्चित करील. मंडळाच्या सदस्य सचिवाच्या आदेशानंतर तो प्रसृत करण्यात येईल.

(६) कारखाना पोट कलम (५) अन्वये मंडळाच्या आदेशाच्या दिनांकापासून

तीस दिवसाच्या आत या नियमांच्या तरतुदीनुसार काढण्यात आलेला ऊसाचा दर देईल:

परंतु, जर कारखान्याने उक्त तीस दिवसांच्या कालावधीत हा दर देण्यात कसूर केली तर त्यावर प्रतिवर्षी बारा टक्के दराने व्याज देय असेल:

परंतु, आणखी असे की,या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही साखर कारखान्यास, जर त्याची आर्थिक स्थिती चांगली असेल तर, पोट कलम (५) अन्वये मंडळाने निश्चित केलेल्या दराहून अधिक दर देण्यास प्रतिबंध होणार नाही:

परंतु, तसेच अशा प्रकरणात असा कारखाना साखर आयुक्ताची पूर्वमान्यता घेईल.

कलम 10. ऊस उत्पादकाना प्रदाने :-

(१) ऊसाच्या इलेक्ट्रॉनिक पध्दतीने नोंदविलेल्या वजनाच्या आधारे ऊस उत्पादकांना ऊसाच्या दराचे प्रदान करण्यात येईल. देय असलेला ऊसाचा दर हा निकटतम रुपयात पूर्णाकांत असेल.

(२) ऊस उत्पादकांना सर्व प्रदाने ही फक्त बँक खात्यामार्फतच करण्यात येतील.

प्रकरण -३

➢ महसूली विभागणी सुत्रानुसार दर (आर. एस. एफ./RSF) म्हणजे काय?

१) आर. एस. एफ. /RSF दर म्हणजे काय ?

- रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार कारखान्याच्या साखर विक्री मुल्याच्या ७५% किंवा साखर व प्राथमिक उपपदार्थ म्हणजेच मळी, भुसा आणि प्रेसमड विक्री मुल्याच्या ७०% या पैकी जे जास्त् आहे तो त्या कारखान्याचा आर. एस. एफ. दर असेल. सदरचा दर एफ. आर. पी. व्यतिरिक्त आहे.

- कारखान्याचा आर. एस. एफ. ऊसदर कारखान्याच्या एफ. आर. पी. दरापेक्षा जास्त निघत असेल तरच देय होतो.

२) हा आर. एस. एफ. दराचा शेतक-यांना वाटा देणेबाबत राज्य शासनाने खालीलप्रमाणे तरतुद केलेली आहे.

३) आर. एस. एफ. ला कोण मान्यता देते ?

- सदर दराची गणना आर्थिक वर्ष संपल्यानंतर ४ महिन्यांनी केली जाते. सदर दर निश्चितीकरता कायद्यात ऊस नियामक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर दर ऊस नियामक मंडळाच्या मान्यतेने साखर आयुक्त घोषित करतात.

४) आर. एस. एफ. दरांना मान्यता मिळाल्यावर नंतर काय होते?

- आर. एस. एफ. दर घोषीत झाल्यानंतर राज्य शासनाच्या कायद्यानुसार घोषीत दिनांकाच्या १ महिन्याच्या आंत दरा प्रमाणे होणारी रक्कम ऊस पुरवठादार

- शेतकऱ्यांना कारखान्याने देणे अपेक्षीत आहे.

५) आर. एस. एफ. दर जाहीर करुन सुध्दा शेतकऱ्यांना रक्कम मिळाली नाही तर काय करावे?

- दर घोषित झाल्यानंतर एक महिन्याच्या आत शेतक-यांना अदा न झाल्यास राज्य सरकारच्या कायद्यानुसार त्यावर १२% दराने व्याज देय होते. सदर रक्कम न मिळाल्यास शेतकऱ्याने ही रक्कम मिळण्यासाठी विहीत मार्गाने अर्ज करावा.

प्रकरण -४

<u>शेतक-यांनो हे लक्षात ठेवा,</u>

१) केन्द्र सरकार एफ. आर. पी. चा दर जाहिर करताना तो शेतातील ऊसाकरिता असतो. महाराष्ट्र व कर्नाटक राज्ये वगळून अन्य राज्यातील शेतकरी स्वत: ऊस तोडून व वाहतूक करून कारखाना किंवा ऊस खरेदी केंद्रापर्यंत आणून देतात. त्यामुळे या राज्यांकडून केंद्र सरकारने जाहिर केलेली ढोबळ एफ. आर. पी. पूर्णपणे अदा केली जाते. तथापि महाराष्ट्र राज्यात शेतक-याच्या शेतातून ऊस तोडून वाहतूकीचे काम कारखाना शेतक-याच्या वतीने करतो, त्यामुळे तोडणी व वाहतूकीकरिता आलेला सरासरी प्रती मेट्रिक टन खर्च केंद्र सरकारने जाहिर केलेल्या ढोबळ एफ. आर. पी. मधून वजा करून निव्वळ एफ. आर. पी. शेतक-याच्या बँक खात्यावर जमा केली जाते.

केंद्र सरकारने जाहिर केलेल्या ढोबळ एफ.आर.पी. तून कारखान्याच्या मागील वर्षीचा सरासरी तोडणी व वाहतूक खर्च वजा केला जातो. तोडणी व वाहतूक खर्च वजा जाता निव्वळ एफ.आर.पी. ऊस उत्पादक शेतक-यांना अदा केली जाते.

२) शेतक-यांना जर केंद्र सरकारने जाहिर केलेला ढोबळ एफ. आर. पी. दर, कारखान्याचा ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा खर्च वजा न करता पूर्णपणे स्विकारायचा असेल तर तो आपला ऊस कारखान्याच्या तोडणी व वाहतूक कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणे स्वत: तोडणी व वाहतूक करून कारखान्यास देऊ शकतो. तसे विकल्प शेतक-याने ऊस नोंदणीवेळी देणे आवश्यक आहे.

गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर ऊस तोड वेळापत्रकाची अंदाजे तारीख कारखान्याकडुन देण्यात येते. जर ऊस पुरवठादार शेतक-यास स्वत: ऊस तोड करून कारखान्यास ऊस पोहोच करावयाचा असेल तर कारखान्याच्या ऊसतोडणी वेळापत्रकाप्रमाणे ऊस तोड गेटवर कधी आणावा याबाबत ऊस आणण्यापुर्वी कारखान्याच्या संबधित अधिका-यांशी सल्लामसलत करून तोडणी व वाहतुकीचे नियोजन करणे उचित राहिल.

३) तुम्ही पुरविलेल्या ऊसाची देय रक्कम १४ दिवसात मिळणे हा कायदेशीर हक्क आहे.

४) अशी रक्कम १४ दिवसात न मिळाल्यास त्यावर १५% दराने व्याज मिळण्याचाही कायदेशीर अधिकार आहे.

५) कारखान्यास पुरविलेल्या ऊसाचे विहित कालमर्यादेत रक्कम किंवा त्याच्यावर विलंबाने प्रदान केलेल्या रकमेचे व्याज न मिळाल्यास आपण प्रथम संबंधित कारखान्यास लेखी तक्रार करावी.

६) करार करण्याची तरतुद ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील कलम ३ मध्ये आहे. एफ. आर. पी. रक्कम स्विकारण्याबाबत नियमानुसार वैयक्तिक करार केल्यास कराराच्या अटीं प्रमाणे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना रक्कम मिळेल. मात्र असा करार करण्याबाबत शेतकऱ्यांना सक्ती करता येणार नाही. स्वेच्छेने असे करार करता येईल.

७) ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ च्या तरतुद कलम १ नुसार जाहीर केलेल्या एफ. आर. पी. रक्कमे पेक्षा कमी दराचे करार करता येणार नाहीत. केंद्र

सरकारने जाहिर केलेली एफ.आर.पी. प्रत्येक सहकारी व खाजगी कारखान्याला देणे बंधनकारक आहे.

८) कारखान्याकडे तक्रार करून ऊस बिलाची रक्कम न मिळाल्यास जवळच्या प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयात तक्रार नोंदवावी. आपला जिल्हा ज्या कार्यालयाच्या कक्षेत आहे हि माहिती व संबंधित कार्यालयाचे पत्ते व ई-मेल या पुस्तकातील पुढील पानावर दिलेले आहेत.

प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाचे पत्ते व संपर्क क्रमांक

अ.क्र.	प्रादेशिक सहसंचालक	कार्यक्षेत्रातील जिल्हे
१	प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे साखर संकुल, पहिला मजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५ दूरध्वनी (०२०)२५५३८०४१ ते ४४ rjdsug.pune@gmail.com	पुणे, सातारा
२	प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर घर नं १३१५, सी वार्ड सरोज अपार्टमेंट लक्ष्मीपुरी, कोल्हापूर-०२ दूरध्वनी (०२३१)२६४०४०० rjdkop@gmail.com	कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
३	प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर त्रिलोक चेंबर्स, दुसरा मजला, लाल टाकी रोड, अहमदनगर -४ दूरध्वनी (०२४१)२४३१६६९/२३२७२३८ rjdahmednagar@rediffmail.com	अहमदनगर, नाशिक,
४	प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद भूविकास बँक इमारत, क्रांती चौक, औरंगाबाद दूरध्वनी (०२४०)२३३१४७० rjdaurangabad१२३@gmail.com	औरंगाबाद, बीड, जालना, जळगाव, धुळे, नंदुरबार
५	प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड दुसरा मजला, भूविकास बँक इमारत, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था समोर, नांदेड दूरध्वनी (०२४६२)२५४१५६ rjdsnanded@gmail.com	नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली
६	प्रादेशिक सहसंचालक (साखर), अमरावती सहकार संकुल, कोमा नगर (कॅम्प), खामगाव अर्बन सहकारी बँकेजवळ, अमरावती ४४४६०१ दूरध्वनी (०७२१)२६६७१४४/२६६०५८४ rjdamr@gmail.com	अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम
७	प्रादेशिक सहसंचालक (साखर), नागपूर नवीन प्रशासकीय इमारत, २ विंग ए, सहावा मजला, जिल्हा परिषद समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर -१ दूरध्वनी (०७१२)२५३५२८१ rjdnagpur@gmail.com	नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली.
८	प्रादेशिक सहसंचालक (साखर), सोलापूर २६/२७, मद्दा मंगल कार्यालय, पन्ना चौक, रविवार पेठ, सोलापूर-४१३००५ rjdsugarsolapur@gmail.com	सोलापूर, उस्मानाबाद

श्री. शेखर नारायण गायकवाड (भा.प्र.से.)

एम.एससी.(कृषि), एम.ए. (समाजशास्त्र)

एम.ए. (तत्वज्ञान), एल.एल.बी.

भारतीय प्रशासकीय सेवेतील २००२ च्या तुकडीतील अधिकारी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्य प्रशासकिय अधिकारी (२०००-२००५), अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक (२००५-२००९), "यशदा" येथे निबंधक (२००९-२०१०), मुख्यमंत्र्याचे सहसचिव म्हणून कामकाज (२०१०-२०१३), मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे (२०१३-२०१५), जिल्हाधिकारी, सांगली (२०१५-२०१७), भूजल संचालक (२०१७-२०१८) म्हणून काम पाहिले. सध्या राज्याचे साखर आयुक्त. प्रशासकीय कारकिर्दीत नावीन्यपूर्ण कामकाजामुळे प्रसिद्ध. स्पर्धात्मक परीक्षेच्या तयारीसाठी हजारो विध्यार्थांना मार्गदर्शन, राज्यातील अनेक महसूल अधिकारी व कर्मचा-यांना कायदेविषयक प्रशिक्षण, यशदा, सिम्बोयिसिस, पुणे येथे व्याख्याता, जागतिक बँकेमार्फत बॅकाँक येथे प्रशिक्षण संस्थांच्या व्यवस्थापनाबददल आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग (२००९).

लेखन-

शेतक-यांनो सावधान (१९९६), फेरफार नोंदीची निर्गती- एक आदर्श कार्यपध्दती (१९९९), गोष्टीरूप जमीन व्यवहार नीती (२००२), शेतीचे कायदे (२००५), महसूल अधिका-याचे अर्धन्यायिक कामकाज (२००७), घरपोच धान्य योजना (२०१०), कायदा माहितीचा अन व्यक्ती स्वातंत्र्याचा (२०१०), शेतक-यांनो जमिनी सांभाळा (२०१०), प्रशासनाच्या नव्या वाटा (२०१२), Land Rights And Mutations In Maharashtra (२०१२), स्पर्धेच्या पलिकडे (२०१४), Land Issues in India (२०१६), Land Laws in Maharashtra (२०१७) हि पुस्तके प्रकाशित

www.shekhargaikwad.bolgspot.in

श्री. मंगेश भगवंत तिटकारे

एम.एससी.(बॉटनी), एम.ए. (समाजशास्त्र), एम.ए. (राज्यशास्त्र),

एम.ए. (इतिहास), एम.ए. (अर्थशास्त्र), पी.जी.डी.बी.ए. (एच. आर.)

वित्त व लेखा सेवा (वर्ग-२) म्हणून सन १९९३ साली प्रशासकीय सेवेत सुरूवात. सहकार विभागात १९९६ पासून सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) म्हणून कामकाज. सहाय्यक संचालक, साखर आयुक्तालय (१९९८-२००४), सहाय्यक निबंधक, सहकार आयुक्तालय (२००४-२००८), उपनिबंधक- आस्थापना, सहकार आयुक्तालय (२००८-२०१२), उपसंचालक- पणन संचालनालय (२०१२-२०१५), जिल्हा उपनिबंधक- मुंबई शहर-१ (२०१५-जून २०१७), सध्या सहसंचालक (अर्थ)- साखर आयुक्तालय, पुणे येथे कार्यरत.

शेतक-यांच्या विविध आंदोलन प्रसंगी संवेदनशिलता दाखविणारा एक सक्षम अधिकारी.